# प्रेस नोट ता.३०/०१/२०२१

## अट्टल घरफोड्या करणारा जेरबंद, एकुण ५ गुन्हे उघडकीस

## पिंपरी चिंचवड, गुन्हे शाखा, युनिट १ ची धडक कारवाई

पिंपरी चिंचवड शहरामध्ये घरफोडीचे प्रमाण वाढले असलेने सदर प्रकारचे घरफोडीचे गुन्हे उघकीस आणण्यासाठी मा. पोलीस आयुक्त श्री. कृष्ण प्रकाश, मा. अपर पोलीस आयुक्त श्री. रामनाथ पोकळे मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री. सुधीर हिरेमठ यांनी गुन्हे शाखेतील पोलीस अधिकारी यांना सुचना दिलेल्या होत्या त्याप्रमाणे गुन्हे शाखा युनिट १ येथील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी युनिट १ हद्दीत पाहिजे फरारी, रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक करीत असताना युनिट १ चे **पो.हवा. ४५४ बाळु कोकोटे व पो.शि.१७९१ प्रमोद गर्जे,** यांना एक इसम चोरीचा मोबाईल घेऊन तो विक्री करणेकामी लांडेवाडी चौकामध्ये येणार असल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्याने सदर माहितीबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक डॉ. अमरनाथ वाघमोडे यांना सदर बाबत माहिती कळविली व त्यांच्या सुचनेप्रमाणे लांडेवाडी चौक, भोसरी येथे सापळा लाऊन युनिट १ चे टीमने मोठया शिताफिने संशयीत इसमास ताब्यात घेतले. त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव अजय रिका पवार वय.१९ वर्षे रा. आपले घर जकात नाका, खराडी, पुणे असे सांगितले. त्याची अंगझडती घेतली असता त्याचे जवळ सॅमसंग कंपनीचा पांढऱ्या रंगाचा मोबाईल मिळुन आला सदर मोबाईल बाबत समाधानकारक उत्तर दिले नाही. त्यासकडे सखोल चौकशी केली असता सदर मोबाईल त्याने दोन साथीदाराच्या मदतीने हिंजवडी येथुन चोरी केल्याचे सांगितले.

सदर मोबाईल बाबत अधिक माहिती घेतली असता सदर मोबाईल हा हिंजवडी पो.स्टे. ५७६/२०२० भा.द.वि.कलम ३८० घरफोडीमध्ये चोरी गेल्याचे निष्पन्न झाले. सदर व्यक्तीकडे अधिक चौकशी केली असता खालील प्रमाणे गुन्हे केल्याची कबुली दिली आहे.

१) भोसरी पोलीस स्टेशन गु.र.नं. ६०१/२०२० भा.द.वि. कलम ४५४,४५७,३८०,

२) हिंजवडी पोलीस स्टेशन गु.र.नं.५७६/२०२० भा.द.वि.कलम ३८०

३) देहुरोड पोलीस स्टेशन गु.र.नं.१३२/२०२० भा.द.वि. कलम ४५४,४५७,३८०

४) चाकण पोलीस स्टेशन गु.र.नं. ६०१/२०२० भा.द.वि. कलम ४५४,४५७,३८०

५) आळंदी पोलीस स्टेशन गु.र.नं. २६७/२०२० भा.द.वि. कलम ४५७,३८०

वरील प्रमाणे गुन्हे उघडकीस येऊन सदर गुन्ह्यात चोरी गेलेल्या सोन्या-चांदिचे दागिणे, रोख रक्कम असा मुद्देमाल आरोपीकडुन हस्तगत करण्यात आला.

सदरची कारवाई मा. पोलीस आयुक्त श्री. कृष्ण प्रकाश, मा. अपर पोलीस आयुक्त श्री. रामनाथ पोकळे मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री. सुधीर हिरेमठ, मा. सहा पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. आर.आर. पाटील, मा सहा पोलीस आयुक्त श्रीमती प्रेरणा कट्टे यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक डॉ. अमरनाथ वाघमोडे, पो.उप नि. काळुराम लांडगे, पोलीस अंमलदार रविंद्र राठोड, रविंद्र गावंडे, राजेंद्र बोरसे, बाळु कोकाटे, अमित गायकवाड, अमित खानविलकर, सोमनाथ बोऱ्हाडे, महादेव जावळे, सुनिल चौधरी, सचिन उगले, प्रमोद हिरळकर, गणेश महाडीक, प्रमोद गर्जे, मारोती जायभाय, आनंदा बनसोडे यांनी केली आहे.